# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:21.04.2025** **वार:सोमवार**

---

1. समाजातील प्रत्येक व्यक्तीला जगवण्याची जबाबदारी समाजाची-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
2. फ्रान्समधील कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी चार मराठी चित्रपटांची निवड
3. वेव्ज परिषदेसाठी माध्यम प्रतिनिधींच्या नोंदणीकरता येत्या बुधवारपर्यंत मुदतवाढ आणि
4. कवी केशवसुत यांच्या रत्नागिरीतल्या मालगुंड गावात 'पुस्तकांचं गाव' उपक्रमाचा प्रारंभ

**कृत्रिम अवयव-मुख्यमंत्री**

समाजातील प्रत्येक व्यक्तीला जगवण्याची जबाबदारी समाजाची आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात केलं. भारत विकास परिषदेचं विकलांग पुनर्वसन केंद्र आणि ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीनं दिव्यांगांना कृत्रिम अवयव बसवण्याचा विक्रम केला आहे; या विक्रमाची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली असून; त्याचं प्रमाणपत्र काल प्रदान करण्यात आलं; या सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. भारत विकास परिषद आणि ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीने अत्यंत नियोजनबद्ध व्यवस्था करून; सेवा आणि समर्पण हा भाव ठेऊन दिव्यांगांना कृत्रिम अवयव देण्याचा एक नवीन जागतिक विक्रम तयार केला. हा विक्रम पुन्हा हीच संस्था मोडेल असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमापूर्वी माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले........

**भारत विकास परिषदेने एक नवीन वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे. यापूर्वी दिव्यांगांना जे इम्प्लांट्स लावले जातात त्याचा जो रेकॉर्ड होता, तो या ठिकाणी मोडण्यात आलेला आहे, आणि पूर्वीच्या रेकॉर्ड पेक्षा दुप्पट काम अर्ध्या काळात करण्याचं एका दिवसात चार तासात करण्याचं काम जवळपास आठशे पेक्षा जास्त दिव्यांगांना चार तासात दोन हजारच्यात इंप्लांट लावण्याचं काम झालेलं आहे. गिनीज बुकने या रेकॉर्डला मान्यता दिलेली आहे आणि आता त्याचं सर्टिफिकेट प्रदान करण्याचा सोहळा आहे याकरता महत्त्वाचा आहे की याच्यामध्ये अनेक दिव्यांगांचं कल्याण झालेलं आहे त्यांना इम्प्लांट्स मिळालेले आहेत खूप मोठा सामाजिक आशय आहे आणि म्हणूनच अशा प्रकारचा कार्यक्रम असल्यामुळे आम्ही सगळे या ठिकाणी आलो आहोत.**

**पिंक-ई रिक्षा**

महिला आणि बाल विकास विभागाने पिंक ई-रिक्षा योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वाचं पाऊल टाकलं आहे असं प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर इथं केलं. या योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील 50 पात्र महिला लाभार्थ्यांना फडणवीस यांच्या हस्ते पिंक ई-रिक्षा

वितरित करण्यात आल्या, त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज पुण्यात 60 पिंक ई रिक्षा वितरीत करण्यात येणार आहेत.

**<u>मराठी कान</u>**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने फ्रान्समधील कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी चार मराठी चित्रपटांची निवड केली आहे. यात 'स्थळ', 'स्नो फ्लॉवर' आणि 'खालिद का शिवाजी' या तीन मराठी चित्रपटांचा समावेश आहे. तसंच 'जुनं फर्निचर' या चित्रपटाची विशेष निवड करण्यात आल्याची घोषणा, सांस्कृतिक कार्य मंत्री अँड आशिष शेलार यांनी काल दादर इथं पत्रकार परिषदेत केली. फ्रान्समध्ये येत्या 14 ते 22 मे या कालावधीत कान चित्रपट महोत्सव होत आहे.

**<u>आंबेडकर</u>**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना जागतिक व्यासपीठावर नेण्याचा संकल्प असल्याचं सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी काल मुंबईत सांगितलं. संविधानाचा अमृत महोत्सव आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सादर करण्यात आलेल्या 'जागर संविधानाचा गौरव विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांचा' या सांगीतिक कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातून दिलेली मूल्य, तत्व आणि विचार जगाला मार्गदर्शक आहेत; त्यामुळे अमेरिका आणि युरोपमधील विद्यापीठात या संदर्भात चर्चासत्र, शोधनिबंध सादर करण्यात येतील, असं शेलार म्हणाले.

**<u>वेव्हज</u>**

माध्यमांकडून मिळालेल्या चांगल्या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट- वेव्हज 2025 साठी माध्यम प्रतिनिधी नोंदणीची मुदत तीन दिवस वाढवण्यात आली आहे. आजपासून बुधवारपर्यंत यासाठी नोंदणी करता येणार आहे. येत्या एक ते चार मे दरम्यान मुंबईत ही परिषद होणार आहे. वेव्हज इंडीया डॉट ओआरजी या संकेतस्थळावर नोंदणीसाठी संपर्क साधावा, असं संयोजन समितीतर्फे कळवण्यात आलं आहे.

**<u>पुस्तकांचे गाव-रत्नागिरी</u>**

विश्व मराठी साहित्य संमेलनात दिल्या जाणाऱ्या साहित्यभूषण पुरस्काराची रक्कम या वर्षीपासून 10 लाख रुपये केली जाणार असल्याची घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केली आहे. सामंत यांच्या उपस्थितीत कवी केशवसुत यांचं रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड हे पुस्तकांचं गाव म्हणून घोषित करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. मालगुंडच्या कवी केशवसुत स्मारकाच्या नूतनीकरणासाठी एक कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणाही सामंत यांनी केली. या लोकार्पण सोहळ्याला कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक, ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**<u>ईस्टर</u>**

ईस्टर म्हणजेच प्रभू येशू ख्रिस्तांच्या पुनरुत्थानाचा दिवस काल राज्यात विविध ठिकाणी भक्तीभावात साजरा करण्यात आला. यानिमित्त ठिकठिकाणच्या चर्चमधून विशेष प्रार्थनेसह अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**पोषण-वाशिम**

देशभरात 8 एप्रिलपासून पोषण पंधरवडा सुरू आहे. या अंतर्गत वाशिम जिल्हा परिषदेच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालयाच्या वतीने अंगणवाडी स्तरावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे. याबाबत अधिक माहिती देताना अंगणवाडी सेविका जयश्री ठाकरे म्हणल्या.....

**दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पोषण पंधरवडा हा कार्यक्रम अंगणवाडीमध्ये राबवण्यात येत आहे. पहिली थीम बाळाचे हजार दिवस बाळाची दोन वर्षापर्यंत अतिरिक्त काळजी घेतली पाहिजे ही आम्ही जनजागृती करत असतो. बेनिफिशियरी मॉड्यूल अंगणवाड्या हे आता पेपरलेस होणार आहेत. त्यामुळे शासनाने पोषण ट्रॅकर हे ॲप उपलब्ध करून दिलेले आहेत. कुपोषित बालकांवर तर आम्ही दरवर्षी काम करतच होतो आता यामध्ये बाळाची भूक चाचणी कशी घेतली जाते हे तपासले जातील याबद्दल आम्ही जनजागृती करत आहे.**

**भाजपा-वक्फ**

अलीकडेच मंजूर झालेल्या वक्फ सुधारणा कायद्यामुळे होणाऱ्या फायद्यांविषयी, विशेषतः मुस्लिमांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी भारतीय जनता पक्षानं देशव्यापी मोहीम सुरू केली आहे. येत्या 5 मे पर्यंत ही मोहीम सुरू राहणार आहे. या संदर्भात नवी दिल्ली इथल्या पक्षाच्या मुख्यालयात अलीकडेच देशभरातील भाजप पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा पार पडली.

**बीड-रेल्वे**

अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामाला गती आली असून बीडपर्यंत रेल्वे रूळाचं काम पूर्ण झालं आहे. बीड ते परळी या महत्वाच्या टप्याचं काम देखील आता वेगात सुरू असून काल सकाळी बीड ते वडवणी रेल्वे इंजिनची चाचणी करण्यात आली.

**बियरबार बंदी-गोंदिया**

गोंदिया तालुक्या अंतर्गत येणाऱ्या अदासी गावात दारूचं दुकान बंद करण्यासाठी काल मतदान घेण्यात आलं. यात गावातल्या 1 हजार 120 महिलांपैकी 788 महिलांनी दुकान बंद करण्याला समर्थनं केलं. ही निवडणूक प्रक्रिया राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आणि जिल्हा प्रशासनाच्या देखरेखीत पार पडली.

**शिक्षक घोटाळा-गोंदिया**

विदर्भातील शिक्षक घोटाळ्याची विशेष चौकशी पथकामार्फत न करता उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीकडून व्हावी अशी मागणी कॉंग्रेस आमदार नाना पटोले यांनी केली आहे.

**डॉ वळसंगकर**

सोलापूरमधील मेंदूविकार तज्ञ डॉ शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्या प्रकरणी वळसंगकर हॉस्पिटल मधील प्रशासकीय महिला अधिकारी मनीषा मुसळे - माने हिला सोलापूर शहर पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने तिला तीन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. आत्महत्येपूर्वी डॉक्टर वळसंगकर यांनी लिहिलेल्या चिठ्ठीत मनीषा मुसळे-माने हिच्यामुळेच टोकाचं पाऊल उचलत असल्याचा आरोप केला असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने पंजाब किंग्स इलेव्हन संघाचा 7 गडी आणि 7 चेंडू राखून पराभव केला. पंजाब संघाचे 157 धावांचे लक्ष्य बंगळुरू संघाने देवदत्त पड्डीकल आणि विराट कोहली यांच्या अर्धशतकाच्या जोरावर सहज पार केलं. तर दुसऱ्या सामन्यात मुंबई इंडियन्सने चेन्नई सुपर किंग्ज संघाचा 9 गडी राखून पराभव केला. चेन्नईने 176 धावांचं लक्ष्य दिलं होतं; मुंबईनं रोहित शर्मा आणि सुर्यकुमार यादव यांच्या नाबाद तडाखेबंद अर्धशतकांच्या जोरावर 26 चेंडू राखत हे लक्ष्य पूर्ण केलं.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या बहुतांश भागात कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत वाढ झाली आहे, येत्या 24 तासात विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**